**‘ प्रेस नोट’**

दिनांक २०/०७/२०२१

# कुख्यात गॅंगस्टर युसूफ बचकाना यास खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, मुंबई यांनी केले अटक.

| | | |
|---|---|---|
| पोलीस ठाणे | : | खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | : | गु.प्र.शा., गु.र.क्र. ५०/२०२१ कलम ३८७, ३४ भा.द.वि.सं. (घाटकोपर पोलीस ठाणे गु.र.क्र. ५२२/२०२१) |
| फिर्यादी | : | बांधकाम व्यावसायीक. |
| घटनास्थळ | : | फिर्यादी याचे कार्यालय, घाटकोपर, मुंबई. |
| गुन्हा घडला दिनांक | : | दि. १९/०५/२०२१ रोजी पासून दि. ०८/०६ /२०२१ पर्यंत . |
| अटक दिनांक | : | दि. २०/०७/२०२१ रोजी अटक . |
| आरोपी अटक | : | युसूफ सुलेमान कादरी उर्फ युसूफ बचकाना. |
| थोडक्यात हकिकत | | गुन्हयातील फिर्यादी हे बांधकाम व्यावसायीक असून त्याचे मुंबई, पनवेल परिसरांत मोठे प्राजेक्ट चालू आहेत. त्यांना गॅंगस्टर युसूफ बचकाना याने दिनांक १९/०५/२०२१ रोजी आंतरराष्ट्रीय व्हॉटस्अप नंबर वरून कॉल करून त्याने यापूर्वी दाऊद, छोटा राजन, छोटा शकील या संघटीत टोळीसाठी काम केले असल्याचे सांगितले व त्याने त्याच्या गुन्हेगारी कारवायांबाबत युटयूब वरील व्हिडिओ क्लिप पाठवून फिर्यादीच्या मनामध्ये दहशत निर्माण केली. तसेच मुंबई व पनवेल मधील बांधकाम प्रोजेक्ट सुरू ठेवायचे असतील तर फिर्यादिला गुडलक म्हणून ५० लाख रूपये खंडणी दयावी लागेल, असे सांगितले. जर फिर्यादी यांना रोख रक्कम देता येत नसेल तर त्याबदल्यात पनवेल, नवी मुंबई येथील प्रोजेक्ट मधील दोन फ्लॅट देण्याची मागणी केली. फिर्यादी यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर युसूफ बचकाना याने ‘‘घर मे छोकरे लोक घुसेंगे, फटाके-बिटाके फोडेगे तबी तेरे को अच्छा लगेगा।’’ असे धमकाविले. त्यामुळे फिर्यादी यांनी भितीपोटी गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे युसूफ बचकाना याच्या विरूध्द तक्रार अर्ज दिला होता.<br><br>त्या तक्रार अर्जामध्ये खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अधिक शहानिशा करीत होते. युसूफ बचकाना नावाने धमकी देणारा इसम हा स्वत: खुन, दरोडे सारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणारा रेकॉडवरील गुन्हेगार युसूफ बचकानाच असल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले. युसूफ बचकाना हा खुनाच्या गुन्हयामध्ये कर्नाटक मधील कारागृहामध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पोलीसांना त्याचा मागोवा लागू नये म्हणून आंतरराष्ट्रीय व्हॉटसअप नंबरचा वापर करून फिर्यादीस धमकावीत होता. फिर्यादी हे युसूफ बचकाना याच्या कॉलना प्रतिसाद देत नसल्याने, फिर्यादीस युसूफ बचकाना याच्या मुंबई शहरातील हस्तकाने मुंबईमधील लॅंडलाईन क्रमांकावरून फोन करून ‘‘युसूफभाई का फोन क्यू नही उठाता?’’ असे बोलून पुन्हा |

Scanned with CamScanner

धमकाविले. त्यावरून दिनांक ०८/०६/२०२१ रोजी घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई येथे फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्याचा पुढील तपास खंडणी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई करीत असून आरोपी युसूफ बचकाना यास कायदेशीर प्रक्रीया करून बेल्लारी, कर्नाटक येथून ताब्यात घेवून त्यास मा. न्यायालयात आज हजर केले असता त्यास मा. न्यायालयांने दिनांक २७/०७/२०२१ पर्यत पोलीस कोठडी दिली आहे.

अटक आरोपी युसूफ बचकाना हा यापुर्वी गॅंगस्टर रवी पुजारी याच्या टोळीसाठीही काम करीत असल्याने त्याच्या अटकेमुळे गुन्हेगारी कारवायांबाबत अधिक माहिती उजेडात येणार आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. मिलींद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विरेश प्रभू , मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. प्रकाश जाधव, मा. स.पो.आ., डी (विशेष), श्री. शशांक सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे प्र.पो.नि. योगेश चव्हाण व खंडणी विरोधी पथक, मुंबई यांनी पार पाडलेली आहे.

Scanned with CamScanner